# ●...अवलीया  बाबा...●

**अवलीया अवलीया माझे**

**गजानन बाबा अवलीया ||**

रूप गोजीरे तुमचे बाबा

आजानुबाहू तुम्ही यतिवरा

उंच सडसडीत वर्ण सावळा

सतेज की हो तुमची काया...

**अवलिया अवलिया  माझे...**

जात कुळाचा न लागे अंत

खरे खरे हो तुम्ही महासंत

अयोनी तुम्ही नरदेह अवतारी

आलात भूवरी ताराया...

**अवलिया अवलिया माझे...**

कर्म कांडाला देउनी फाटा

दाविल्यातुम्ही भक्तीच्या वाटा

स्वानुभवातून बोध घ्यावा

सांगुनी रचला परमार्थाचा पाया...

**अवलिया अवलिया माझे...**

शक्ती तुमची अपार बाबा

कणांकणां वरी तुमचा ताबा

पोटां मध्ये नितांत माया

सद्गुरूराया देती छाया....

**अवलिया अवलीया माझे**

**गजानन बावा अवलीया**

**सौ. शोभा सतीश राऊत**

**- कोल्हापूर**

**मो.** 992389789

702031903

## ...जय गजानन माऊली...

## ...गण गण गणांत बोते...

●●●